15-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/14/2025 9:57 PM Page 1



## निवडक

### अखिल भारतीय मास्टर्स अॅथलेटिक्स चॅम्पियनशिप रामनाथ देसाई चमकले

टीम दैनिक हेराल्ड



डिचोली, दि. १४ : बंगळुरू येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय मास्टर्स थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत ७५ वर्षांवरील वयोगटात रामनाथ देसाई यांनी १०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्य पदक, ४०० मीटर धावणे स्पर्धेत कास्य पदक तर २०० मीटर धावणे स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावून उज्वल यश संपादन केले आहे. या उज्वल यशामुळे रामनाथ देसाई हे आंतरराष्ट्रीय मास्टर्स थलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी पात्र ठरले असून इंडोनेशिया येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आलेली आहे.

### शांता विद्यालयात विज्ञान दिन उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

शिवोली, दि. १४ : विद्याभारती संचालित सडये शिवोली येथील श्री शांता विद्यालयामध्ये विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून परेश पोरोब उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका प्रजिता सांगाळे, विद्याभारतीचे सदस्य शिव शंकर मयेकर, पालक शिक्षक संघाच या अध्यक्षा शिवानी पेडणेकर, शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीगण उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व सी. व्ही रमन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली तसेच विज्ञान गीताने या कार्यक्रमाचा आरंभ केला मुख्याध्यापिका प्रजिता सांगाळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा शब्द सुमनांनी स्वागत केले. तसेच त्यांच्या कार्यकृर्त्याचा परिचय करून दिला. विज्ञानाचे आपल्या जीवनामध्ये असलेले अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थिनी रिद्धी सांगाळे यांनी सांगितले. परेश पोरोब यांनी विज्ञान व भारतीय संस्कृती यांचे साम्नवयक दर्शविले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल यावेळी त्यांना स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शांता विद्यालयामध्ये विज्ञान दिनानिमित्त, शिशुवाटिका विभाग, प्राथमिक विभाग व इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गशहा विज्ञान प्रकल्प तयार करणे स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्राथमिक विभागामध्ये पहिल्या क्रमांकाचे बक्षीस कुमार दक्ष गोलतेकर याला प्राप्त झाले तसेच दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस स्वयम पाटील व रूतेश पावसकर यांना प्राप्त झाले तर तिसरे बक्षीस ईकरा खान हिला प्राप्त झाली. इयत्ता पाचवीमधून पहिल्या क्रमांकाचे विद्यार्थ्यांसाठी वर्गशहा विज्ञान प्रकल्प तयार करणे स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्राथमिक विभागामध्ये पहिले बक्षीस दक्ष गोलतेकर याला प्राप्त झाले. तसेच दुसरे स्वयम पाटील व रूतेश पावसकर यांना प्राप्त झाले. तर तिसरे ईकरा खान हिला प्राप्त झाल. इयत्ता पाचवीमधून पहिले बक्षीस लविषा लंगोटे हिला मिळाले तर दुसरे समीक्षा परब हिला मिळाले तर इयत्ता सहावीमधून पहिले बक्षीस नासरीन आलम व शर्वानी पेडणेकर हिला मिळाले तर दुसरे मनुश्री गोलतेकर हिला मिळाले तर सातवीमधून विद्यार्थी रिद्धी सांगाळे व लविक्षका लंगोटे याला प्रथम बक्षिसे मिळाली. तर दुसरे फिजा बाजेवाला व श्रेयसी महालकर हिला मिळाले, त्याचप्रमाणे इयत्ता आठवीमधून विद्यार्थी रफीक आलंम व कृष्णा दाभोळकर यांना प्रथम बक्षिसे मिळाले. व दुसरे युतीका सांगाळे व रिया पेडणेकर हिला मिळाले, इयत्ता नववीमधून पहिले बक्षीस राजकिशोर झा व नबीसा मुल्ला यांना बक्षीस मिळाले. व दुसरे बक्षीस राबिया बसरी व अंजली वर्मा यांना मिळाले. शिवशंकर मयेकर यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व अशाच प्रकारे सुजनात्मक वृष्टी वृद्धिंगत करा याबद्दल आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी तस्मिया तंदूर व श्रेयसी महालकर हिने केले तसेच आभार प्रकटन विद्यार्थिनी शर्वाणी. पेडणेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन विज्ञान शिक्षक नवनाथ सावंत यांनी केले.

### धारेश्वर माऊली देवस्थानचा १७ पासून शिशिरोत्सव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १४** : श्री धारेश्वर माऊली देवस्थानचा धारगळ वार्षिक शिशिरोत्सव मोठ्या थाटात होळीपासून आरंभ होत असुन, सदर उत्सवा प्रित्यर्थ ऐतिहासिक व वसंत कालीन नाट्यप्रयोगांचे आयोजन केलेले आहे. सोमवार दि. १७ मार्च रोजी तिथीनुसार छत्रपती शिवाजी जयंतीनिमित्त, रात्री ८ वाजता नाट्यसंपदा निर्मित व राजू कला मंदिर फोंडा आयोजित अखिल गोवा ऐतिहासिक नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेले नाट्यपुष्प 'छावा' हे सादर केले जातील. दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवार दि. १८ रोजी रात्री ८ वाजता स्वर सत्तरी आयोजित संगीत संत कालीन नाटक 'संत गोरा कुंभार' हे साजरे केले जाईल . दरवर्षीप्रमाणे यंदाही दोन्ही नाटक धारगळ येथील युवा व हरहुन्नरी व्यक्तिमत्व विविध अशा सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात जोडलेला युवा श्री ओंकार घनश्याम प्रभू देसाई व कुटुंबीय यांनी ही दोन्ही नाटक पुरस्कृत केलेली आहे. त्याचप्रमाणे धारगळ तसेच पेडणे तालुक्यातील सर्व नाट्यप्रेमींना ओंकार घनश्याम प्रभू देसाई यांनी आव्हान केलेले आहे की, मोठ्या संख्येने या कार्यक्रमात आयोजित केलेला नाटकांचा लाभ घ्यावा व आपली उपस्थिती दाखवावी.

# मुंबई इंडियन्सची फायनलमध्ये धडक

## गुजरातवर मिळवला दणदणीत विजय : हिली-नताली-हरमनप्रीतची ऐतिहासिक खेळी

**कोलकाता, दि. १४ :**



मुंबई इंडियन्सच्या संघाने वुमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासात दुसऱ्यांदा अंतिम फेरीत धडक मारली आहे. मुंबईने एलिमिनेटर सामन्यात गुजरातला ऑल आऊट करत ४७ धावा आणि ५ चेंडू शिल्लक ठेवत पराभव केला. यासह मुंबई इंडियन्सने दुसऱ्यांदा डब्ल्यूपीएल च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. या संपूर्ण सामन्यात मुंबई इंडियन्सने उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला. मुंबईने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना डब्ल्यूपीएलच्या प्लेऑफमधील मोठी धावसंख्या उभारली. यानंतर गोलंदाजीत मुंबईने भेदक गोलंदाजी करत गुजरातला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.

मुंबई इंडियन्स आता डब्ल्यूपीएल २०२५ च्या अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सविरूद्ध भिडणार आहे. मुंबई संघाचे एलिमिनेटर सामन्यात सर्वच खेळाडू चांगल्या फॉर्मात होते. त्यामुळे अंतिम सामना अटीतटीचा होणार आहे. मुंबईचा एलिमिनिटेर सामना पाहण्यासाठी मुंबई इंडियन्सच्या आयपीएल संघाचे खेळाडू आणि स्टाफ तिलक वर्मा, हार्दिक पंड्या आणि कायरन पोलार्ड यांनी उपस्थिती लावली होती.

एका महिन्यात होणार बंपर लाभ, सूर्य देणार करिअरमध्ये यश, मिळेल पैसाच पैसा

मुंबईने दिलेल्या २१४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरूवात खूप खराब झाली. गुजरातचा संघ १९.२ षटकांत १६६ धावा करत सर्वबाद झाला. गुजरातकडून पहिल्याच षटकात बेथ मुनी ६ धावा करत बाद झाली. तर हरलीन देओल ८ धावा करत धावबाद झाली. तर डॅनियल गिब्सनदेखील ३४ धावांवर धावबाद झाली. तर हिलीने एश्ले गार्डनरला ८ धावांवर क्लीन बोल्ड केले. फिबी लिचफिल्ड आणि भारती फुलमाली यांनी चांगली भागीदारी रचली, पण मुंबईच्या संघाने त्यांना सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.

फिबी लिचफिल्ड ३१ धावा, भारती फुलमाली ३० धावा करत बाद झाली. तर काश्वी गौतमही धावबाद झाली. यासह गुजरातने ३ विकेट्स धावबाद करत गमावले. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये गुजरातने झटपट ३ विकेट्स गमावले आणि मुंबईने शानदार विजय नोंदवला. मुंबईकडून हिली मॅथ्यूजने ३ विकेट्स, अमेलिया करने २ विकेट्स आणि शबनम इस्माईल आणि नताली स्किव्हर ब्रंटने १-१ विकेट मिळवली.

मुंबई इंडियन्सने नाणेफेक गमावली आणि संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना २१३ धावा करत वुमन्स प्रीमियर लीगच्या प्लेऑफमधील मोठी धावसंख्या उभारली. मुंबईकडून हिली मॅथ्यूज आणि नॅट स्किव्हर ब्रंट यांनी १३३ धावांची विक्रमी भागीदारी रचली आणि संघाला मोठ्या धावसंख्येचा पाया रचून दिला. यानंतर फलंदाजीला आलेल्या कर्णधार हरमनप्रीत कौरने २२३ च्या वादळी स्ट्राईक रेटने १२ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांसह ३६ धावा केल्या. हिली मॅथ्यूजने ५० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ७७ धावा केल्या तर नताली स्किव्हर ब्रंटने ४१ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची पुन्हा एकदा शानदार खेळी केली.

गुजरातकडून दुखापत झालेल्या डिएंड्रा डॉटिनच्या जागी संघात सामील केलेल्या डॅनिएल गिब्सनच्या जागी ४ षटकांत २ विकेट्स घेतल्या तर काश्वी गौतमनै १ विकेट घेतली. संघाची कर्णधार एश्ले गार्डनर हिने तिच्या स्पेलमधील ४ षटकं पूर्ण न केल्याचा फटका संघाला बसला. गार्डनरने २ षटकांत १५ धावा दिल्या.

## हॅरी ब्रुकवर आयपीएलमध्ये दोन वर्षांची बंदी

**नवी दिल्ली, दि. १४** : आयपीएल २०२५ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. पण यादरम्यान बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएलदरम्यान विदेशी खेळाडू अनेकदा सीझन सुरू होण्यापूर्वीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे माघार घेतात. यामुळे संघांचे बरेच नुकसान होते. हे टाळण्यासाठी बीसीसीआयने लिलावापूर्वीच काही नियम ठरवले होते. आता त्याचा परिणामही दिसून येत आहे. बीसीसीआयने आता इंग्लंडच्या हॅरी ब्रुकवर आयपीएलमधून दोन वर्षांची बंदी घातली आहे. यादरम्यान तो आयपीएल लिलावातही सहभागी होऊ शकणार नाही.

यंदाच्या आयपीएलसाठी लिलावासाठी हॅरी ब्रुकने आपलं नाव नोंदवलं होत. यानंतर त्याचे नाव शॉर्टलिस्ट करण्यात आले आणि त्याच्या नावावर बोलीही लावण्यात आली. दिल्ली कॅपिटल्सने त्याला ६.२५ कोटींमध्ये आपल्या संघात घेण्यात यश मिळविले. मात्र आयपीएलचा हंगाम जवळ येताच हॅरी ब्रूकने आपले नाव मागे घेतले. हॅरी ब्रूकने सलग दुसऱ्या वर्षी असा निर्णय घेतला आहे. यावेळी हॅरीने त्याच्या राष्ट्रीय वचनबद्धतेचे कारण देत माघार घेतली



आहे. आता हॅरी ब्रूक आणखी दोन वर्षे आयपीएल खेळू शकणार नाही.

इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्तानुसार बीसीसीआयने याबाबत ईसीबी म्हणजेच इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला माहिती दिली आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या हवाल्याने अहवालात म्हटले आहे की, बीसीसीआयने नियमानुसार हॅरी ब्रुकवर बंदी घातली आहे. हॅरी ब्रुकसह याची माहिती इंग्लंड क्रिकेट बोर्डाला देखील देण्यात आली.

आयपीएलच्या अनेक संघांना खेळाडूंच्या अशा वागण्याचा त्रास सातत्याने होत होता. आयपीएल लिलावासाठी खेळाडू आपली नावं द्यायचे आणि त्यांची निवड झाल्यावर कुठल्या ना कुठल्या कारणाने ते या स्पर्धेतून आपली माघार घेत असत. हे एकदा नाही तर अनेक वेळा घडले आहे.

## 'सृष्टी रंगोत्सव २०२५'चा पाळीत छानदार प्रारंभ

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**साखळी, दि. १४** : विष्णू स्मृती प्रतिष्ठान गोवातर्फे आयोजित 'सृष्टी रंगोत्सव २०२५'चा प्रारंभ सोहळा समाजसेवक पांडुरंग सावंत यांच्या हस्ते समई प्रज्वलन करून श्री नवदुर्गा सभा मंडप देऊळवाडा पाळी येथे रविवारी झाला. विविध उपक्रम, स्पर्धांचा समावेश आसलेल्या या उत्सवाचे आकर्षण शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेली चित्रकला स्पर्धा ठरली. सदर स्पर्धेत तीन गटात घेण्यात आली.

विविध गटांत विजतेपद पटकावले विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत.

पहिला गट (इयत्ता १ ली व २ री) – प्रथम प्रत्यूक्षा गावकर, द्वितीय जीत गावस, तृतीय रुद्रा आंबेस्कर. दुसरा गट (इयत्ता ३ री ते ५ वी) – प्रथम श्रीनिका गवंडळकर,द्वितीय राजना सूर्लकर, तृतीय अक्षरा नाईक. तिसरा गट (इयत्ता ६ वी ते ८ वी) – प्रथम त्रिशा मयेकर, द्वितीय यादवी चावडीकर, तृतीय जिज्ञा गावस. स्पर्धेचे परीक्षण शंकर हरमलकर व तन्मेश परब यांनी केले. सृष्टी रंगोत्सवाच्या समई प्रज्वलना नंतर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास सृष्टी रंगोत्सवाचे समाजसेवक पांडुरंग सावंत, सत्कारमूर्ती ज्येष्ठ नागरिक अनंत गावस, पाळी ग्रामपंचायत पंचसदस्य प्रशिला गावडे, श्री नवदुर्गा देवस्थान कमिटीचे उपाध्यक्ष रमाकांत गावस, प्रतिष्ठानच्या आसावरी भिडे, किरणकुमार भावे उपस्थित होते.

सुरुवातीला समृद्धी, माधवी, रोशनी, कष्वी, केतकी यांनी मान्यवरांचे फुलांनी स्वागत केले. सरकारी प्राथमिक विद्यालय नवरवाडा पाळीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. किरणकुमार भावे यांनी शब्दांनी स्वागत केले. यावेळी आसावरी प्रसाद भिडे यांनी प्रास्तविक केले. यावेळी ज्येष्ठ नागरिक अनंत गावस यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रशिला गावडे म्हणाल्या, मुलांच्या अंगात अनेक गुण असतात ते अशा स्पर्धांमधून दिसतात व यातूनच त्यांना प्रोत्साहन मिळते व आपले कलागुण ते फुलवू शकतात.

प्रमुख पाहुणे पांडुरंग सावंत म्हणाले, लहान मुलांवर संस्कार करणे गरजेचे. चांगल्या संस्कारातून मुले घडतात विष्णू स्मृती प्रतिष्ठानतर्फे खूप छान उपक्रम चालू आहेत असेच कार्यक्रम होत राहतो अशा शुभेच्छा देत त्यांनी कै. विष्णू भावे आणि त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी परीक्षक शंकर हरमलकर व तन्मेश परब यांना स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली.सूत्रसंचालन किशोर भावे यांनी केले तर प्रसाद भिडे यांनी आभार मानले.

शेवटी राजस भिडे, आराध्य भावे यांनी पसायदान सादर केले. सृष्टी रंगोस्तव २०२५ सांगता सोहळा मे महिन्यात सावंतवाडी महाराष्ट्र येथे होणार आहे, असे अयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे.

फोटो–विष्णू स्मृती प्रतिष्ठान गोवातर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्या व सहभागी स्पर्धकांसोबत पांडुरंग सावंत,अनंत गावस,प्रशिला गावडे,रमाकांत गावस ,आसावरी भिडे,किरणकुमार भावे व इतर

# दीनदयाळ संस्थेचे कार्य प्रेरणादायी

## केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर : दीनदयाळ इंटिग्रेटेड हॉस्पिटल दिली भेट : सेवा प्रकल्प ठरेल आदर्श

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**डिचोली : व्हाळशी येथे उभारण्यात आलेल्या हॉस्पिटलला केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकरजी यांनी भेट देऊन पाहणीवेळी. सोबत आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर, वल्लभ साळकर, डॉ. शेखर साळकर, कांता पाटणेकर संचालक व नगरसेवक.**

**डिचोली, दि. १४** : पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रेरणेने दीनदयाळ संस्थेने आपल्या संघटन कौशल्याच्या बळावर निष्टेने डिचोली भागात पहिले इंटिग्रेटेड हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प केली. तो पूर्ण तडीस नेण्याची जबाबदारी यशस्वी करण्याच्या दिशेने वाटचाल केली. त्यांचा उपक्रम समाजासाठी आदर्श सामाजिक सेवेसाठी असल्याचे उद्‌गार केरळचे राज्यपाल व गोव्याचे सुपुत्र राजेंद्र आर्लेकर यांनी केले. आर्लेकर यांनी गुरुवारी दीनदयाळ संस्थेतर्फे उभारण्यात आलेल्या पहिला इंटिग्रेटेड हॉस्पिटल इमारतीची पाहणी करून त्यांच्याया सामाजिक योगदानाचे कौतुक केले.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशनतर्फे सामाजिक सेवा उपक्रमांतर्गत या हॉस्पिटलसाठी सुमारे २० कोटी रुपये खर्च आलेला असून त्याचा बहुतेक खर्च इंडियन ऑल कॉर्पोरेशनच्या अंतर्गत करण्यात आलेला आहे

यासाठी खुद्द राजेंद्र आर्लेकर यांनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनशी चर्चा करून हा निधी उपलब्ध करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

राजेंद्र आर्लेकर यांनी या प्रकल्पाला सहकार्य करण्यासाठी आपण केवळ निमित्त मात्र असून सर्वांच्या सहकार्यामुळे व सातत्यपूर्ण पाठपुरावा निष्ठा समाजाप्रती असलेली संवेदना आपुलकीची भावना यामुळे डिचोली सारख्या शहरात दर्जेदार इंटिग्रेटेड म्हणजेच आयुर्वेदलोपेथी यांची सांगड घालणारे पहिले सुसज्ज इस्पितळ स साकारले आहे याचा आपल्याला अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण ही इंटिग्रेटेड असावे

ज्याप्रमाणे हॉस्पिटलमध्ये आयुर्वेदिक होमिओपॅथिक ऍलोपॅथी आदींचा उपचार पद्धतींचा वापर होतो त्याच धर्तीवर शिक्षणही आता इंटिग्रेटेड असावे अशा प्रकारची भावना राज्यपाला आर्लेकर यांनी व्यक्त करताना अशा प्रकारचा प्रयत्न विदेशात केला आहे. देशातही तो करणे गरजेचे असून त्यामुळे सर्वसमावेशक आदर्श शिक्षण व्यवस्था येईल, असे त्यांनी स्पस्ट केले. या हॉस्पिटलची इमारत पूर्ण झाली असून साधन सुविधा मशीनरी आदी काम सुरू होणार आहे. आगामी सहा महिन्यात काम पूर्ण होऊन लोकार्पण होणार असल्याचे अध्यक्ष वल्लभ साळकर यांनी सांगितले.

यावेळी आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी दीनदयाळ संस्थेने सामाजिक सेवा क्षेत्रात या इंटीग्रेटेड हॉस्पिटल उभारणीतून आदर्श घालून दिला असून सवलतीच्या दरात रुग्ण सेवा उपलब्ध होणार असल्याने अनेकांना लाभ मिळणार असे स्पष्ट केले.

इन्टी ग्रेटेड हॉस्पिटल म्हणूनच सुरवा तीपासून सकरण्यात येणार हे पहिले हॉस्पिटल असल्याचे डॉ. शेखर साळकर यांनी सांगितले.

यावेळी कांता पाटणेकर नसराध्यक्ष विजय कुमार नाटेकर, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, नगरसेवक, तसेच संस्थेचे संचालक सदस्य अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी आर्लेकर यांनी संपूर्ण हॉस्पिटल इमारतीची पाहणी केली. या पुढेही सर्व ते सहकार्य कारण्याची हमी दिली. वल्लभ साळ कर यांनी सर्वांचे स्वागत केले.

## दिल्ली कॅफिटल्सचा अक्षर पटेलला कर्णधार

**नवी दिल्ली. दि. १४ :**

अक्षर पटेल 'आयपीएल २०२५' मध्ये दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार असेल. फ्रँचायझीने शुक्रवारी याची घोषणा केली. अक्षरसोबतच केएल राहुलचे नावही कर्णधारपदाच्या शर्यतीत समाविष्ट होते. दोन्ही नावांवर विचार करण्यात आला आणि शेवटी अक्षर पटेलला संघाची जबाबदारी देण्यात आली. आयपीएल २२ मार्चपासून सुरू होणार आहे.

अक्षर पटेल २०१९ पासून दिल्ली कॅपिटल्सचा भाग आहे. तो दिल्लीचा सर्वात अनुभवी खेळाडू आहे. गेल्या ६ हंगामात त्याने संघासाठी ८२ सामने खेळले आहेत. ३० च्या सरासरीने २३५ धावा करण्यासोबतच त्याने ७.६५ च्या इकॉनॉमीने ११ विकेट्सही घेतल्या आहेत. तर, एका सामन्यात ऋषभ पंतला स्लो ओव्हर्ससाठी बंदी घालण्यात आल्यामुळे अक्षरने संघाचे नेतृत्व केले आहे. मात्र, या सामन्यात त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

आयपीएल मेगा लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्सने अक्षर पटेलला १६.५० कोटी रुपयांना कायम ठेवले होते. १५० आयपीएल सामन्यांमध्ये फलंदाज म्हणून त्याने १३०.८८ च्या स्ट्राईक रेटने आणि २१.४७ च्या सरासरीने १६५३ धावा केल्या आहेत.

## बुमराह आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यात नाही खेळणार

**मुंबई, दि. १४ :**

मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयपीएल-२०२५ च्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये खेळणार नाही. तो बंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) येथे रिकव्हरी करतोय.

बुमराहचा वैद्यकीय अहवाल ठीक आहे. त्याने उजए मध्ये पुन्हा गोलंदाजी सुरु केली आहे. तो एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात संघात सामील होईल. पण यासाठी एनसीएच्या वैद्यकीय पथकाकडून फिटनेस प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तोपर्यंत मुंबई संघाने ३ सामने खेळले असतील.

बुमराहला बीजीटीच्या शेवटच्या कसोटी सामन्यात दुखापत झाली होती. पाठीच्या दुखापतीमुळे बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमधूनही बाहेर पडला. गेल्या आयपीएलमध्ये मयंक यादवला दुखापत झाली होती. तेव्हापासून त्याने फक्त ३ देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याला स्नायूंच्या ताणाचा त्रास होत आहे. आयपीएल-२०२५ २२ मार्च रोजी कोलकाता येथे सुरू होईल. या हंगामातील पहिला सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात खेळला



जाईल. मुंबई २३ मार्च रोजी चेपॉक येथे चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर २९ मार्च रोजी ते अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्स (जीटी) विरुद्ध खेळतील.

मुंबईचा पहिला घरचा सामना ३१ मार्च रोजी कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) विरुद्ध होईल. त्यानंतर संघ ४ एप्रिल रोजी लखनौमध्ये लखनौ सुपर जायंट्स आणि ७ एप्रिल रोजी मुंबईत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्ध खेळेल.

अक्षर पटेल आयपीएल २०२५ मध्ये दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार असेल. फ्रँचायझीने शुक्रवारी याची घोषणा केली. अक्षरसोबतच केएल राहुलचे नावही कर्णधारपदाच्या शर्यतीत समाविष्ट होते. दोन्ही नावांवर विचार करण्यात आला आणि शेवटी अक्षर पटेलला संघाची जबाबदारी देण्यात आली. आयपीएल २२ मार्चपासून सुरू होणार आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 192 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .